# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका एक — विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण**

दिनांक : २० जानेवारी, २०१९

(**वेळ** : सकाळी १०.३० ते दुपारी १.००)

**(एकूण गुण : १००)**

---

**सूचना** :- (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.
(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.
(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करण्यात येऊ नये.

**गुण**

**प्रश्न क्र.१ पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **२०**

मुंबई प्रांतात रेल्वे असावी असा उठाव मुंबईला प्रथम सर जमशेटजी जिजीभाई आणि जगन्नाथ नाना शंकरशेट यांनी केला. मूळजी जेठा मोरारजी गोकुळदास, आदमजी पीरभाई, डेविड ससून वगैरे अनेक नामांकित नगर शेटजींचे अर्थात त्यांना पाठबळ होतेच. सन १८५३ मध्ये ग्रेट इंडियन पेनिनशुला रेल्वेचा पहिला छोटा फाटा मुंबई ते ठाणे पर्यंत एकेरी रस्त्याचा तयार झाला.लोखंडी रुळावरुन इंग्रज आगगाडी चालवणार, ही कल्पनाच लोकांनी मोठी अचंब्याची वाटली.

अखेर मुहूर्ताचा दिवस जाहीर झाला. दिनांक १८ एप्रिल सन १८५३, सोमवार रोजी सायंकाळी ५ वाजता पहिली आगगाडी मुंबईहून निघाली. पाना-फुलांचे हार, तोरणे, निशाणे लावून १० मोठे खोलीवजा डबे शृंगारलेले, इंजिनावर अंग्रेजांचे मोठे निशाण फडकत आहे. डब्यांत गादीच्या खुर्च्या, कोच यांवर रेल्वेचे सगळे डायरेक्टर, सर जमशेटजी जिजीभाई, नाना शंकरशेट आणि अनेक इतर नगरशेट जामानिमा करून बसलेले. बरोबर पाच वाजता आगगाडीने कूऽक शिटीचा कर्णा फुंकून आपल्या भकभक, फकफक प्रवासाला सुरुवात केली. मुंबई ते ठाणे दुतर्फा लाखांवर लोक कलियुगांतला हा विंग्रेजी चमत्कार पाहायला आ वासून उभे होते. ना बैल, ना रेडा, ना घोडा आणि वाफेच्या जोरावर एक नाही, दोन नाही, दहा डब्यांची माळका खुशाल चालली आहे झुकझुक करत लोखंडी रुळांवरुन ! कमाल आहे बुवा या विंग्रेजांची ! आता तर काय ? विस्तव आणि पाणी यांची सांगड घालून विंग्रेजांनी वाफेलाच गाडी ओढायला लावले !

मुहूर्तावर निघालेली पहिली आगगाडी ठाण्याला जाऊन मुंबईला सुखरूप परत आली ; पण त्या वाफेच्या गाडीत बसायचा लोकांना धीरच होईना. दुसऱ्या दिवसापासून लोकांना मोफत ठाणे ते मुंबई आणि परत नेण्या-आणण्याची दवंडी पिटण्यात आली. आगगाडीत बसणे धोक्याचे नाही, प्रवास लवकर नि सुखाचा होतो, हे लोकांना पटवण्याची रेल्वेच्या कारभाऱ्यांनी खूप आटापिटा केला; पण लोकांत भलत्याच कंड्या नि अफवांचे पीक पिकले होते. वाफेची गाडी ही विंग्रेजांची विलायती भुताटकी आहे, मुंबईला नव्या इमारती नि पूल बांधताहेत, त्यांच्या पायांत जिवंत गाडायला फूस लावून

कृ.मा.प.

गुण

माणसे नेण्याचा हा साळसूद डाव आहे, आपल्या अफवांपुढे शहाणे प्रचारक काय करणार? एक दोन दिवस सरकारी कचेरीतले कारकून, व्यापाऱ्यांच्या पेढीवरचे गुमास्ते यांना मुंबई ते ठाण्याला नेऊन परत आलेले लोकांना दाखवले. त्यांनी आपले अनुभवही सांगितले. तेवढ्यानेही कोणाचे समाधान होईना.

अखेर दर माणशी एक रुपया इनाम आणि मोफत प्रवासाचा डंका वाजवला. पैशाच्या लालुचीने ठाण्याच्या घंटाळीवरचे आणि मुंबईचे लोक आगगाडीने जाऊ लागले का त्यांच्या घरची माणसे आजूबाजूला उभी राहून ठणाण धाय मोकलायची. त्यांची समजूत काढता काढता रेल्वेचे अधिकारी अगदी टेकीला यायचे. एकदा ते प्रवासी ठाणे- मुंबईची सफर करुन सुखरूप परत आले, म्हणजे मग मात्र चौकशी करण्याऱ्यांचे घोळकेच्या घोळके जमायचे.

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :-

(अ) लोकांना वाटणारी मोठी अचंब्याची घटना कोणती ?

(ब) गुंबईहून निघणाऱ्या आगागाडीचे कसे वर्णन केले आहे ?

(क) कलियुगातला विंग्रेजी चमत्कार कोणता ?

(ड) लोकांमध्ये रेल्वेच्या बाबतीत कोणती अफवा पसरली ?

(इ) घरची माणसे धाय मोकलून का रडायची ?

**प्रश्न क्र.२ गट "अ"मधील वाक्यप्रचारांची गट "ब" मधील अर्थाशी समान जुळणी करा.** १०

| "अ" गट | "ब" गट |
|---|---|
| (अ) आभाळ कोसळणे | (१) उतावीळ होणे |
| (ब) जीव अधीर होणे | (२) पक्के ध्यानात ठेवणे |
| (क) चंग बांधणे | (३) सर्वत्र मान मिळवणे |
| (ड) खूणगाठ बांधणे | (४) रणांगणावर मृत्यू येणे |
| (इ) धारातीर्थी पडणे | (५) एकाएकी फार मोठे संकट येणे |
| (फ) पोटात घालणे | (६) लक्ष ओढून घेणे |
| (ग) लौकिक मिळवणे | (७) मदत करणे |
| (ह) हात देणे | (८) एकमेकांशी न जमणे |
| (य) लक्ष वेधून घेणे | (९) क्षमा करणे |
| (र) विसंवाद असणे | (१०) निश्चय करणे |

**प्रश्न क्र.३ पुढीलपैकी कोणत्याही पाच शब्दांचा वाक्यात उपयोग करा.** १०

(अ) प्रतिकूल (ब) आकाश

(क) समाजसुधारक (ड) निसर्ग

(इ) सत्य (फ) क्रीडांगण

**प्रश्न क्र.४ पुढीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५ ते ६ ओळींत लिहा.** **गुण २०**

(१) शिरीषच्या भूमिकेतून आपल्याला कोणता संदेश मिळतो ते लिहा?

(२) सर्वजण बंडूनानांच्या खोली का गेले व तेथे काय चमत्कारिक प्रसंग पहायला मिळाला?

(३) 'व्हेनिस हे पाण्यातले जगातले एकमेव शहर आहे' पाठाच्या आधारे या विधानाची सत्यता पटवून द्या

(४) एडिसनने बांबू पासून कार्बन तयार करण्याचा विचार का केला?

(५) संतांचे कार्य नेहमीच मार्गदर्शक ठरते, याविषयी तुमचे मत सोदाहरण स्पष्ट करा.

(६) 'सारंगाचा कळप' असे वसंत अवसरे यांनी कोणाला व का म्हटले आहे?

**प्रश्न क्र.५ कोणत्याही एका पाठाच्या/कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३ ते ४ ओळींत लिहा. (कोणतेही चार)** **१०**

**(अ)** 'बेटा मी ऐकतो आहे' या पाठाच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(१) लेखक शिरीषला कार्यक्रम देण्याचे का टाळत होते ?

(२) लेखकाच्या मनाला कोणती शंका चाटून गेली ?

(३) नानांच्या चेहऱ्यावर तृप्तीचे समाधान स्पष्टपणे का दिसत होते ?

(४) नानांना कोणता धक्का बसला ?

(५) शिरीषला कोणता भास व्हायचा ?

**किंवा**

**(ब)** 'पुन्हा एकदा' या कवितेच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा -

(१) 'मातीत माती व्हावी एक, पुसून टाकीत भेदाभेद' या काव्यपंक्तीतील सामाजिक आशय स्पष्ट करा.

(२) 'पुन्हा एकदा' या कवितेची मध्यवर्ती संकल्पना स्पष्ट करा.

(३) 'पुन्हा एकदा' या कवितेतून कोणता संदेश मिळतो ?

(४) 'पुन्हा एकदा' कवितेतील भाषिक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(५) 'पुन्हा एकदा' या कवितेचा तुम्हाला समजलेला भावार्थ स्पष्ट करा.

**प्रश्न क्र.६ (अ) पुढीलपैकी कोणत्याही पाच इंग्रजी शब्दांचे मराठीतील पर्यायी शब्द लिहा.** **५**

(१) University (२) Zone

(३) Pen-Portrait (४) Tragedy

(५) Court (६) Technology

गुण

**(ब) पुढीलपैकी कोणत्याही पाच संख्या अक्षरात लिहा.** ५

(१) ४२३०

(२) २७५ + ५० = ३२५

(३) ५९० — १८ = ५७२

(४) ७६ x ३२ = २४३२

(५) ३४० ÷ १७ = २०

(६) ३६.८

**(क) रिकाम्या जागी कंसातील शब्दांचे योग्य रुप घालून ती वाक्ये पुन्हा लिहा.** १०

(१) ................ क्षेत्रात जातीभेद नाही, धर्मभेद नाही की वर्णभेद नाही. (क्रीडा)

(२) एडिसनच्या ................ आफ्रिका खंडात हजारो मैल पायी प्रवास केला. (सहकारी)

(३) पक्ष्यांना ................ फारशी काळजी नसते. (थंडीवारा)

(४) हायवेवर वाहनांची वाहतूक चालावी तशी त्या ................ नावांची धावपळ चालली होती. (जलमार्ग)

(५) एक अक्षर न बोलता नाना ................ बसले. (खुर्ची)

(६) दारापाशी आल्यावर मला मी मोडलेल्या ................ आठवण झाली. (बाहुली)

(७) मी माझी ................ शाळा सोडणार होतो. (गाव)

(८) कोणताही एक ................ विषय अन्य अनेक विषयांशी संलग्न असतो. (महत्त्व)

(९) या कुलपाची कल्पना मला आमच्या ................ कुलपांवरुन सुचली. (तिजोरी)

(१०) शरीराच्या प्रत्येक ................ आकार त्याप्रमाणात लहान असणे गरजेचे आहे. (अवयव)

(११) ऑलिंपिक . . . . . लागणारा खर्च फारच मोठा असतो. (सामना)

**प्रश्न क्र.७ (अ) पुढीलपैकी कोणतेही तीन शब्द शुध्द करुन लिहा.** ३

(१) संषय (२) शारिरीक

(३) कनिष्ट (४) सामूदायीक

**(ब) पुढीलपैकी कोणत्याही तीन शब्दांचे वचन बदला.** ३

(१) चांदणी (२) विहीर

(३) खेडे (४) गोष्ट

**(क) पुढीलपैकी कोणत्याही तीन शब्दांचे विरुध्दार्थी शब्द लिहा.** ३

(१) जुने (२) अनुकूल

(३) समता (४) निश्चित

**(ड) कंसातील सूचनेप्रमाणे एक वाक्य बदलून लिहा.** १

(१) राजेश व्यायाम करतो. ( भविष्यकाळ करा. )

(२) मला जवळच जायचे होते. ( नकारार्थी वाक्य तयार करा. )

-*-*-*-*-*-*-*-

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका दोन — सुसंगत लेखन व अनुवाद**

दिनांक : २० जानेवारी, २०१९

(**वेळ** : दुपारी २.१५ ते सायंकाळी ५.००)

**(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)**

**(एकूण गुण : १००)**

---

**सूचना** :- (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.
(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.
(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करण्यात येऊ नये.

**गुण**

**प्रश्न क्र.१ पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार मांडा.** २०

(अ) वाचन संस्कृती गरजेची.

(ब) प्लास्टिकच्या दुष्टचक्रात अडकलेला माणूस.

**प्रश्न क्र.२ पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर चर्चा करा.** २०

(अ) गरिबी, शिक्षण आणि क्षमता या विषयावर चर्चा करा.

(ब) स्त्रियांवरील अत्याचार आणि पुरूषी मानसिकता यांविषयी चर्चा करा.

**प्रश्न क्र.३ पुढीलपैकी कोणत्याही दोन बाबी तयार करा.** ३०

(अ) शाळांमध्ये संगणक योजना राबविण्यासाठी परिपत्रक तयार करा.

(ब) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मध्ये सुधारणा करण्यांबाबतचे प्रसिद्धीपत्रक तयार करा.

(क) माध्यमिक शाळेसाठी जादा प्रवेश मान्यता प्रस्ताव शिक्षण संचालकाकडे सादर करा.

**प्रश्न क्र.४ पुढीलपैकी प्रत्येक गटातून कोणत्याही पाच संज्ञांचे मराठी पर्याय द्या.** १५

**"अ" गट**

(अ) Deputy Director (ब) Influence

(क) Good Conduct (ड) Without reason

(इ) Suspension (फ) Adverse

कृ.मा.प.

गुण

"ब" गट

(अ) Deputation (ब) Particular

(क) Advanced (ड) Faith

(इ) Training (फ) Administration

"क" गट

(अ) Conduct (ब) Nourishment

(क) Influential (ड) Parallelism

(इ) Well-preserved (फ) Exchange

प्रश्न क्र.५ खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्यांचे मराठीत भाषांतर करा. १५

(अ) Declare that the powers of the Lagislature of the state shall be excercisable by or under the Authority of Parliament.

(ब) Provide for the maintenance of accounts by money-lenders and for the inspection of such accounts by offers appointed in that behalf by the District Council.

(क) Safe guarding the interests to weaker section of society, including the handicapped and mentally retarded.

(ड) Provision of urban amenities and facilities such as parks, gardens, playgrounds.

(इ) Cattle pounds, prevention of cruelty to animals.

(फ) None of the associate members shall have a right to vote or to sign any decision of the Delimitation Commission.

*-*-*-*-*-*-*-*-*-*